# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. २८२ / २०२०

**विषय :— विद्यापीठ परिसरातील निवास वितरणासंबंधीचे विनियम २०२०**

दि. २४ सप्टेंबर,२०२० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. म: २३३/२४०९२० नुसार सोबत जोडलेल्या प्रमाणे ' विद्यापीठ परिसरातील निवास वितरणासंबंधीचे विनियम २०२०' मान्यता दिलेली आहे. सदर विनियमाची अंमलबजावणी दिनांक १५ ऑक्टोबर,२०२० पासून करण्यात येईल.

( डॉ. प्रफुल्ल अ. पवार )
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे — ४११ ००७
जा.क्र. गृव्य/२०२०/२७३
दिनांक : १३/१०/२०२०

प्रत माहितीसाठी :—

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.विभागप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

} कृपया सदर परिपत्रक सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे ही विनंती.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# विद्यापीठ परिसरातील निवास वितरणासंबंधीचे विनियम, २०२०

[महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७५(१)(ङ) अन्वये)]

## १. संक्षिप्त नाव व आरंभ:

(१.१) सदर विनियमास 'विद्यापीठ परिसरातील निवास वितरणासंबंधीचे विनियम, २०२०' म्हणण्यात येईल.

(१.२) सदर विनियम हे परिपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

२. **विद्यापीठाच्या आवारातील निवासस्थानांच्या वाटपासाठी खालील निकष लागू असतील—**

(२.१) कर्मचाऱ्याची निवासस्थानाची गरज.

(२.२) प्रतीक्षायादीवरील स्थान

(२.३) विद्यापीठाच्या अत्यावश्यक सेवांची गरज

३. **विद्यापीठाच्या आवारात निवासस्थान मिळण्यासाठी खालील पात्रता निकषांची पूर्तता आवश्यक आहे —**

(३.१) संविधानिक अधिकारी अथवा कमीत कमी पाच वर्षे कालावधीकरिता नियुक्त सेवक अथवा नियमित वेतनश्रेणीमधील सेवक सेवेत कायम असावा.

(३.२) अर्जदार सेवकांचे स्वत:च्या नावे पुणे व पिंपरी—चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये घर नसावे (अशा आशयाचे हमीपत्र आवश्यक).

(३.३) विद्यापीठाच्या सेवेत असलेल्या पती—पत्नी दोघांपैकी एकालाच निवासस्थानाचे वितरण केले जाईल, मात्र शासन नियमाप्रमाणे दोघांना घरभाडेभत्ता देय राहणार नाही.

(३.४) विद्यापीठाच्या सेवेत असलेल्या वडील/आई—मुलगा/मुलगी दोघांपैकी एकालाच निवासस्थानाचे वितरण केले जाईल.

४. **निवास वितरणाचे प्रकार —**

(४.१) **नवीन निवास** — विद्यापीठ परिसरात विद्यापीठाच्या निवासस्थानात रहात नसलेल्या आणि पात्रता निकष पूर्ण करीत असलेल्या विद्यापीठ सेवकाने विहित प्रक्रियेने अर्ज सादर केल्यानुसार व प्रतीक्षा यादीमधील ज्येष्ठतेनुसार सेवकास 'नवीन निवास' वितरित करण्यात येईल.

(४.२) **समश्रेणीत बदली निवास** — विद्यापीठाच्या निवासस्थानात रहात असलेला सेवक सध्याच्या निवासामध्ये काही गैरसोय असल्यास आणि त्याच श्रेणीतील दुसरे गैरसोयी नसलेले निवास रिकामे झाल्यास सदर बदली निवास मिळणेसाठी अर्ज करता येईल व अशा सेवकास रिक्त असलेले निवास 'बदली निवास' म्हणून वितरीत करण्यात येईल.

(४.३) **सुधारित निवास (श्रेणीसुधार)** — विद्यापीठ परिसरात विद्यापीठाच्या निवासस्थानात रहात असलेल्या सेवकास पदोन्नती मिळून श्रेणीत बदल झालेला असल्यास अथवा सरळ सेवेने वरिष्ठ श्रेणीतील पदावर रुजू झालेला असल्यास अशा सेवकास नवीन श्रेणीतील निवासस्थान मिळण्यासाठी अर्ज सादर करता येईल व 'सुधारित निवासस्थान' वितरीत करण्यात येईल.

(४.४) **प्रशासकीय सोयीसाठी बदली निवास** — विद्यापीठ परिसरात विद्यापीठाच्या निवासस्थानात रहात असलेल्या सेवकाचे निवास नवीन इमारतीच्या बांधकामामध्ये, नवीन रस्त्यांच्यामध्ये, कालबाह्य झालेली निवासस्थाने सक्तीने पाडणे कारणास्तव, निवासस्थानाचे रूपांतर कार्यालयात करण्यासाठी किंवा प्रस्तावित विद्यापीठ विकास आराखड्यात अडथळा ठरत असेल तर अशा सेवकास सदर निवासस्थान सक्तीने रिकामे करून, रिकामे असलेले त्याच श्रेणीचे बदली निवासस्थान प्राध्यान्याने व विशेष बाब म्हणून वितरीत करण्यात येईल.

५. **विद्यापीठ आवारात निवास मिळण्यासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया व प्रतीक्षा यादी** —

(५.१) निवासस्थान मिळण्यासाठी पात्र सेवकांनी नवीन निवासस्थान, सुधारित अथवा बदली निवासासाठी विहित नमुन्यातील अर्ज विहित प्रक्रियेद्वारे प्रशासन विभागामार्फत गृहव्यवस्थापन कार्यालयाकडे जमा करून, तशी पोहोच घेणे आवश्यक आहे. अशा अर्जांचा समावेश गृहव्यवस्थापन कार्यालयामार्फत प्रतीक्षायादीमध्ये करण्यात येईल व ती प्रतीक्षायादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(५.२) अर्जदाराने आपल्या अर्जाचा समावेश प्रतीक्षायादीमध्ये झालेला असल्याची खातरजमा करून घ्यावी. त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास तसे गृहव्यवस्थापन कार्यालयास अवगत करील.

(५.३) निदर्शनास आणलेल्या त्रुटींची गृहव्यवस्थापन कार्यालयाकडून खातरजमा करण्यात येईल व त्यानुसार योग्य ते बदल प्रतीक्षायादीमध्ये करण्यात येतील.

(५.४) प्रत्येक वर्षी दिनांक १ जानेवारी व १ जुलै रोजी प्रतीक्षायादी अद्यायावत करण्यात येईल. प्रतीक्षायादी अद्यायावत करताना ज्या अर्जदारांना निवासाचे वितरण करण्यात आलेले आहे अशा अर्जदारांची व ज्या अर्जदारांना निवास वितरीत करून सुद्धा १५ दिवसांच्या आतमध्ये निवासस्थान स्वीकारले नाही अशा अर्जदारांची नावे प्रतीक्षायादीतून वगळण्यात येतील.

६. **निवास वितरणाची प्रक्रिया** —

(६.१) शिक्षक व शिक्षकेतर निवासस्थानांचे वितरण कुलगुरूंनी गठीत केलेल्या स्वतंत्र निवास वितरण समितीमार्फत केले जाईल.

(६.२) वितरण करण्यायोग्य रिक्त निवासस्थान उपलब्ध असल्यास तसेच त्यासाठी मागणी अर्ज असल्यास गृहव्यवस्थापन विभाग निवास वितरण समितीच्या बैठकीचे आयोजन करेल.

(६.३) निवास वितरण समिती, निवास वितरण करतांना खालील बाबी विचारात घेईल —

(६.३.१) (एक) समश्रेणीतील बदली निवासासाठी अर्ज केलेल्या अर्जदारांचा प्राधान्याने विचार केला जाईल व त्यांना विद्यापीठाच्या आवारात प्रत्यक्ष रहाण्याकरिता आलेल्या तारखेपासूनची ज्येष्ठता लक्षात घेऊन प्राधान्याने बदली निवासस्थानांचे वितरण करण्यात येईल.

(दोन) समश्रेणीतील बदली निवासाचे वितरण झाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या वितरणयोग्य रिक्त निवासस्थानांचे वितरण करताना जास्तीत जास्त ५०% निवासस्थाने सुधारित निवासस्थाने म्हणून वितरित करण्यात येतील. यासाठी विद्यापीठाच्या आवारात प्रत्यक्ष रहाण्याकरिता आलेल्या तारखेपासूनची ज्येष्ठता लक्षात घेवून प्राधान्याने सुधारित निवासस्थानांचे वितरण करण्यात येईल. परंतु याबाबत निवास वितरण समितीचा निर्णय अंतिम राहील.

(६.३.२) निरनिराळया वर्गातील एकूण निवासस्थानांच्या २% निवासस्थाने अपंगत्व, स्वातंत्रसैनिकांचे पाल्य, माजी सैनिक या संवर्गातील सेवकांना त्यांनी निवास मागणी अर्ज केल्यास प्राधान्याने देण्यात येतील. अशा सेवकांची प्रतीक्षायादी स्वतंत्रपणे अस्तित्वात असेल.

(६.३.३) एखाद्या श्रेणीतील एकच निवासस्थान रिक्त असेल व त्यासाठी त्याश्रेणीतील एकापेक्षा जास्त सेवकांनी बदली अथवा सुधारित निवास म्हणून मागणी केल्यास त्यापैकी सेवाज्येष्ठ सेवकास प्राधान्य देण्यात येईल.

(६.३.४) नवीन निवास दिल्यानंतर किमान दोन वर्षांपर्यंत व सेवानिवृत्तीच्या शेवटच्या वर्षात बदली निवास तसेच सुधारीत निवास दिले जाणार नाही.

(६.३.५) नव्याने निवासस्थान देताना शासनाच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे आरक्षणाच्या तरतुदी लागू राहतील.

(६.३.६)

(एक) विद्यापीठाच्या निवासस्थानामध्ये राहणारा सेवक निवृत्त होण्याच्या दिवशी किंवा मयत झालेल्या दिवशी जर त्यांची पत्नी/मुलगा/मुलगी(अविवाहित) विद्यापीठाच्या त्यांच्याच श्रेणीमध्ये सेवेत असेल तर सेवानिवृत्त होणाऱ्या/मयत झालेल्या सेवकाच्या नावावर असलेले निवासस्थान त्यांची पत्नी, मुलगा किंवा अविवाहित मुलीच्या नावाने देण्यात येईल. परंतु तो/ती सेवेत रुजू झाल्यापासून अथवा मागील लगतच्या तीन वर्षापासून सदर सेवकासोबत विद्यापीठाच्या निवासस्थानात रहात असावा/ असावी अन्यथा सदर निवास त्याच्या/तिच्या नावे करता येणार नाही.

(दोन) मात्र सेवानिवृत्त होणाऱ्या/मयत झालेल्या सेवकास विद्यापीठाने दिलेले निवासस्थान त्याची पत्नी, मुलगा किंवा अविवाहित मुलगी यांच्या श्रेणीप्रमाणे नसेल तर सदर सेवकाची पत्नी, मुलगा किंवा अविवाहित मुलगी यांना त्यांच्या श्रेणीप्रमाणे मागणी केल्यास उपलब्धतेनुसार निवासस्थान बदलून दिले जाईल.

(६.३.७) विद्यापीठासाठी अत्यावश्यक सेवा प्रदान करणाऱ्या सेवकांना मा.कुलगुरू यांच्या पूर्व परवानगीने प्राधान्याने निवास वितरण करण्यात येईल.

(६.३.८) सामान्यत: विद्यापीठात असणाऱ्या विविध अध्यासनांच्या प्रमुखांना विद्यापीठ आवारात निवास देय असणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या प्रमुखांच्या निवासस्थान मागणी संदर्भातील अर्ज असेल तर अशा प्रकरणांमध्ये सदरील सेवकास मा.कुलगुरू यांच्या पूर्व परवानगीने निवास वितरीत करण्यात येईल.

(६.३.९) शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना वितरीत करण्यात येणारे निवास हे संपूर्ण दुरूस्ती/नूतनीकरण केल्यानंतरच वितरीत करण्यात येईल.

(६.३.१०) शिक्षकांसाठी असलेली निवासस्थाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वितरीत करण्यात येणार नाहीत. तसेच शिक्षकेतर सेवकांसाठी असलेली निवासस्थाने शिक्षकांना वितरीत करण्यात

येणार नाहीत.

(६.३.११) मा.निवास वितरण समितीने एखाद्या सेवकास निवास वितरीत करण्यासंदर्भात निर्णय घेतल्यानंतर त्या निवासामध्ये असणाऱ्या सर्व सुखसोयींची (उदा. पंखे, टयुबलाईट, फर्निचर इ.) यादी करून त्यांच्याकडून हमीपत्र घेऊन निवास वितरीत करण्यात येईल.

(६.३.१२) वितरीत केलेले निवासस्थान सेवकाने आहे त्या स्थितीत स्विकारून त्वरीत तसे पत्र १५ दिवसांच्या आत गृहव्यवस्थापन कार्यालयाकडे द्यावे. आपण निवासस्थान स्वीकारल्याचे पत्र वरील मुदतीत न दिल्यास आपण सदर निवासस्थान स्वीकारित नाही असे गृहीत धरून समिती प्रतिक्षायादीतील पुढील अर्जदारास सदर निवासस्थानाचे वितरण करील यांची नोंद घ्यावी.

७. **निवास रिक्त करण्यासंबंधीचे नियम –**

(७.१) प्रतीक्षा यादीतील क्रमांकानुसार संबधित सेवकास सुधारित निवासाचे वितरण केल्यानंतर संबधित सेवकाने १५ दिवसाच्या आतमध्ये सुधारित निवासात रहाण्यास गेले पाहिजे व पूर्वीचे निवास गृहव्यवस्थापन विभागाच्या ताब्यात त्वरित देण्यात येईल.

(७.२) सदर सेवकाने जर निवास १५ दिवसाच्या आत गृहव्यवस्थापन कार्यालयाच्या ताब्यात दिले नाही तर त्यांच्यांकडून जुन्या निवासाचे भाडे दंडनीय दराने वसूल करण्यात येईल. शिवाय त्यांच्याविरूध्द स्थावर व्यवस्थापन अध्यादेश १८० नुसार कारवाई करण्यात येईल.

(७.३) (एक) सेवक निवृत्त अथवा मयत झाल्यास त्याचे निवासस्थान त्वरित रिक्त करून विद्यापीठाच्या ताब्यात देणे आवश्यक आहे. परंतु सहानुभूतीपूर्वक निवृत्त सेवकास तीन महिने व मयत सेवकाच्या कुटुंबियांना सहा महिन्यांपर्यंत सदर निवासस्थान वापरता येईल. मात्र अशा निवासस्थानासाठी सदर सेवकाच्या शेवटच्या वेतनातील घरभाडे भत्ता अधिक अनुज्ञाप्ती शुल्क व इतर शुल्क यांच्या एकत्रित रकमेएवढी रक्कम घरभाडे म्हणून आकारण्यात येईल. सदर रक्कम सेवानिवृत्त सेवक अथवा मयत सेवकाच्या कुटुंबियांना चलनाद्वारे विद्यापीठात प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपर्यंत भरावी लागेल.

(दोन) सेवानिवृत्तीनंतरच्या, तीन महिन्यानंतर विशेष बाब म्हणून निवास ठेऊन घेण्यास कुलगुरू यांनी परवानगी दिली असेल तर त्या काळात सदर सेवकाकडून कुलगुरू यांनी आदेश दिल्याप्रमाणे अथवा दंडनीय दराप्रमाणे घरभाडे व नियमाप्रमाणे इतर शुल्क संबंधित सेवक किंवा त्यांचे कुटुंबीय यांच्याकडून घेण्यात येईल.

(तीन) मात्र ही सवलत ज्या सेवकास विद्यापीठाने कोणत्याही कारणाने सेवेतून बडतर्फ /सेवामुक्त केले असेल, त्यास दिली जाणार नाही. अशा सेवकाने त्यास विद्यापीठाने दिलेले निवास त्वरित गृहव्यवस्थापन कार्यालयाच्या ताब्यात दिले पाहिजे. त्याशिवाय त्याला विद्यापीठाकडून देय असलेली कोणतीही रक्कम दिली जाणार नाही.

(७.४) एखाद्या सेवकास वितरीत केलेले निवास सलग तीन महिने निवासस्थान म्हणून वापर न केल्याचे आढळून आल्यास मा.निवास वितरण समिती प्रत्यक्ष शहानिशा करून संबधित निवास रिक्त करून ताब्यात घेईल व प्रतीक्षा यादीमधील पुढील सेवकास वितरीत करेल.

८. **शिक्षक निवासाबाबत विशेष तरतुदी –**

| **शिक्षकी पदाचे नाव** | **निवासस्थान इमारत** |
|---|---|
| सहायक प्राध्यापक/समकक्ष | A,B,C,D |
| सहयोगी प्राध्यापक/समकक्ष | I,J,K,L,M,N,O,P,Q |
| प्राध्यापक/वरिष्ठ प्राध्यापक/समकक्ष | E,F,G,H |

•शिक्षक निवास वितरणाबाबत विद्यापीठाने वेळोवेळी घेतलेले निर्णय बंधनकारक असतील

९. **निवासस्थानात रहात असताना निवास वापराबाबतचे नियम व निर्बंध —**

विद्यापीठ आवारात निवास करणारे सेवक अथवा त्यांचे कुटुंबीय यांनी खाली नमुद केलेले कृत्य अथवा इतर प्रतिबंधित कृत्य केल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी ज्या सेवकांच्या नावे निवासस्थान वितरीत केले आहे त्यांची असेल व सदर बाब ही शिस्तभंग व गैरवर्तन मानले जाईल. अशा सेवकांचे निवासस्थान काढून घेण्यात येईल. व सदर सेवक शिस्तभंगाच्या/गैरवर्तनाच्या कार्यवाहीस पात्र ठरेल.

(९.१) विद्यापीठाच्या निवासात राहणाऱ्या कोणत्याही सेवकास प्रशासनाच्या पूर्व परवानगी शिवाय पाळीव प्राणी अथवा पक्षी पाळता येणार नाही.

(९.२) विद्यापीठाच्या निवासात राहणाऱ्या सेवकाने किंवा त्यांचे कुटुंबीय यांनी शेजाऱ्यांशी सौजन्यपूर्ण वर्तन करणे अपेक्षित आहे.

(९.३) विद्यापीठ परिसरात निवास करणाऱ्या सेवकाने अथवा सेवकांनी पर्यावरणाला धोका पोहचेल असे कृत्य करू नये. उदा. चूल वापरणे, वृक्षतोड करणे इत्यादी.

(९.४) विद्यापीठाने वितरीत केलेल्या निवासी जागेचा वापर व्यवसायासाठी अथवा उद्योगधंद्यासाठी करता येणार नाही.

(९.५) विद्यापीठ निवासात राहणाऱ्या सेवकांनी/ त्यांच्या कुटुंबियांनी विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करू नये. तसेच या संदर्भातील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग होणार नाही. याची दक्षता संबंधित सेवकांनी घेणे आवश्यक आहे.

(९.६) विद्यापीठ निवासात राहणाऱ्या सेवकांना स्थावर विभागाच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचे बांधकाम/शेड/गोठा इत्यादीचे कायम स्वरूपी/तात्पुरत्या स्वरूपातील काम करता येणार नाही असे केल्याचे निदर्शनास आल्यास संबधित बांधकाम तात्काळ काढून टाकण्यात येईल व त्यासाठी येणारा खर्च सेवकाकडून वसूल करण्यात येईल.

(९.७) विद्यापीठ सेवकास वितरीत केलेल्या निवासस्थानामध्ये पोट भाडेकरू अथवा इतर नातेवाईक ठेवण्यास सक्त मनाई असेल.

(९.८) वाहनतळ, जिना, गच्ची व इतर सामाईक जागा यांचा वैयक्तिक कारणांसाठी वापर करीत असतील तर त्यांचे त्या ठिकाणचे सामान जप्त केले जाईल.

(९.९) विद्यापीठाने प्रतिबंधित केलेले तसेच इतर कोणतेही बेकायदेशीर कृत्य केल्यास

१०. **इतर सर्वसाधारण नियम —**

(१०.१) वितरीत केलेले निवास संबधित सेवकाने ताब्यात घेतल्यानंतर निवासाचे घरभाडेभत्ता, अनुज्ञाप्ती शुल्क, सेवाशुल्क, पाणी पट्टी, सफाईपट्टी व त्या अनुषंगाने इतर शुल्क, त्या सेवकाच्या वेतनामधून कपात करण्याविषयी गृहव्यवस्थापन विभागाकडून प्रशासन व वित्त विभागास लेखी कळविण्यात येईल.

(१०.२) विद्यापीठ आवारात निवास आवश्यक असणाऱ्या संविधानिक अधिकारी तसेच अत्यावश्यक सेवांच्या प्रमुख अधिकाऱ्यांना भाडे व इतर शुल्क विद्यापीठ अधिकार मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार लागू राहील.

(१०.३) निवासस्थानाच्या इमारतीची / परिसराची / निवासस्थानाची सक्षम अधिकारी अथवा त्यांच्या परवानगीने सुरक्षा, स्थावर, गृहव्यवस्थापन विभागातील कर्मचारी संबधितांना पूर्वसूचना देऊन तपासणी करू शकतील.

(१०.४) विद्यापीठाच्या निवासस्थानामध्ये काही तोडफोड किंवा इतर निवासस्थानास नुकसान पोहचविले असेल तर सदरची नुकसान भरपाई संबंधित सेवकाच्या वेतनातून कपात करण्यात येईल.

(१०.५) मुद्दा क्रमांक ३ व्यतिरिक्त निवास वितरीत करण्याचा व सदर निवासाचे भाडे आकारण्याचा निर्णय विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद घेईल.

(१०.६) महाराष्ट्र शासन व विद्यापीठ यांनी निवास वितरणाबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले नियम अथवा बदल संबंधित सेवकांवर बंधनकारक असतील.

22/09/2020

डॉ. अजय ठुबे
सदस्य सचिव

प्रा. माधवी रेड्डी
सदस्य

श्री. उत्तम चव्हाण
सदस्य

डॉ. दिपक माने
सदस्य

डॉ. प्रफुल्ल पवार
अध्यक्ष